हेल्यो म्यान्द

# खिशातला कुत्रा



हेल्यो म्यान्द
अनुवाद – अनिल हवालदार
चित्रे – स्पर्तांक कालाचेव

# खिव



रादुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई



# ला कुत्ता

© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८२
© иллюстрации, пересказ на русском языке.
Издательство «Детская литература», 1973 г.

Х. Мянд

С СОБАЧКОЙ В КАРМАНЕ

*На языке маратхи*

H. Mänd

A DOG IN MY POCKET

*in Marathi*

सोविएत संघात मुद्रित

M $\frac{70802\text{-}098}{031(01)\text{-}82}$ 865-79

4803010000



# तावी कोण?

आता तू तावी नांवाच्या मुलाची ओळख करून घे. तो पाच वर्षांचा आहे. आणि तो बालोद्यानात जातो.

तू म्हणशील, यात काय विशेष? बरोबर. पण तुझ्यापाशी बोलणारा रबरी कुत्रा असला तर?

तावीपाशी तसा कुत्रा आहे. त्याचं नांव न्यासू. तो खूपच बारीक आवाजात बोलतो हे मात्र खरं. पण न्यासूचं बोलणं तावीला मात्र चांगलं ऐकू येतं. न्यासू हा तावीचा जिवलग मित्र आहे.

# तावीला काय आवडते?

न्यासूबरोबर तावी कसा गप्पा मारायचा हे माहीत करून घ्यायची तुझी अर्थातच इच्छा असेल. जरा थांब. प्रथम तावीला काय काय आवडतं ते ऐक.

तावीला गायला आवडतं. तुलासुद्धा कदाचित गायला आवडत असेल. तसंच रस्त्यावर खोदयंत्रं कशी काम करतात ते पहायला तावीला आवडतं.

दाराला लोंबकळायला तावीला आवडतं. सणासुदीला आजीकडून सुंदर भेटकार्डं घ्यायलाही त्याला खूप आवडतं. सर्वांत आधी तावीला लौकर वाढून मोठं व्हायचंय. तुला माहीत आहे, मोठं झाल्यावर हवं तसं वागता येतं.

# तावीला काय आवडत नाही?

तावीला आजारी पडायला आवडत नाही. आणि बहुधा तुलासुद्धा आवडत नाही ना?

रबरी फुगे फुटतात हे तावीला आवडत नाही. वाढदिवस नेहमी नसतो हे आवडत नाही, टेलि-व्हिजनचं बटण फिरवायला परवानगी नाही हे आवडत नाही. अशा आणखी हजार वेगवेगळ्या गोष्टी त्याला आवडत नाहीत. तुलासुद्धा बहुधा त्या आवडत नसतील. तर अशी तावीशी तुझी थोडीशी ओळख झाली.







# अस्सल पुरुष

सर्व मोठी माणसं पूर्वी लहान मुलं होती हे तावीला ठाऊक आहे. पण ती वाढली कशी, मोठी झाली कशी ते त्याला माहीत नाही.

एके दिवशी संध्याकाळी तावीनं आपल्या आईला विचारलं:

"तू मोठी कशी झालीस?"

"मी ताटलीतली सगळी खीर खाल्ली!"

"खीर खाल्ली म्हणजे लौकर मोठं होता येतं?"

"अर्थातच. टॉफी किंवा केक खाण्यापेक्षा नक्कीच लौकर."

तावीनं मान डोलावली आणि पटकन ओटची खीर संपवून टाकली. एवढंच नाही तर दूधही पिऊन टाकलं.

"मग? मी थोडा मोठा झालो?" तावीनं विचारलं.

"इतक्या लौकर मोठं होत नाही काही," आई हसून म्हणाली. "रोजच्या रोज खीर खाल्ली पाहिजे. मगच मोठ्ठा अस्सल पुरुष होशील!"

पण तेवढी थांबायची तावीची मुळीच तयारी नव्हती. त्यानं बाबांना विचारलं.

"बाबा, तुम्ही मोठे कसे झालात ते सांगा पाहू?"

बाबांनी वाचत असलेलं वर्तमानपत्र बाजूला ठेवीत म्हटलं:

"मी सकाळ-संध्याकाळ व्यायाम केला."

सकाळी तावीनं बालोद्यानात व्यायाम केला होता. आता संध्याकाळीसुद्धा व्यायाम करायचं त्यानं ठरवलं. तो फरशीवर आडवा झाला. एक पाय त्यानं वर केला, मग दुसरा पायही उचलला आणि पाय फिरवीत राहिला. दमेपर्यंत त्यानं पाय फिरवले.

"आता मी मोठा झालो!" तावी ओरडला.

"इतक्या लौकर नाही काही," बाबा म्हणाले. "रोजच्या रोज व्यायाम केला पाहिजे."

तावी बिछान्यावर जाऊन झोपला. तेवढ्यात न्यासूनं हळूच त्याला आपल्या नाकानं धक्का दिला.

"मला माहीत आहे मोठ्ठं कसं व्हायचं ते" रबरी कुत्रा न्यासू कुजबुजला.

"तुला ठाऊक आहे?" आश्चर्यानं तावीनं विचारलं.

"होय, मी स्वतःच विचार केलाय," न्यासू घोगऱ्या आवाजात हळूच म्हणाला: "जर चवड्यांवर उभा राहिलास तर ताबडतोब उंच होशील."



तावीनं पलंगावरून खाली उडी मारली. चवड्यांवर उभे राहून तो खुर्चीपासून टेबलापर्यंत आणि टेबलापासून कपाटापर्यंत चालत गेला. त्यानं स्वतःला आरशात पाहिलं. खरंच तो उंच झाला होता! तावीला खूप आनंद झाला आणि तो खळखळून हसला. पुन्हा सरळ टाचा टेकवताच तो पूर्वीसारखाच छोटा झाला.

"तू अगदी वेडा कुत्रू आहेस न्यासू," तावी म्हणाला आणि पुन्हा पलंगावर झोपला.

"मी वेडा कुत्रा?" वाईट वाटून न्यासू म्हणाला. "मी तुझा मित्र. मी नक्की विचार करून काहीतरी युक्ती शोधून काढीन."

# छोटा भाऊ

सबंध रात्रभर न्यासू झोपला नाही.

सकाळी बालोद्यानात जाण्यासाठी तावी जेव्हा कपडे घालीत होता तेव्हा न्यासू कुजबुजला:

"तावी, मी तुझ्यासाठी एक युक्ती शोधलीय."

लांब पायमोजा खेचण्याचं थांबवून तावीनं हलकेच विचारलं: "काय?"

"तू मोठा कसा बनशील त्याबद्दल मी विचार केलाय," न्यासू घोगऱ्या आवाजात म्हणाला. "तुला एक छोटा भाऊ असला पाहिजे. तो एवढा लहान असला पाहिजे, एवढा छोटुकला असला पाहिजे, की त्याला स्वतःला काही करता येणार नाही. आणि तुला मात्र सर्व काही करता येईल."

"बरोब्बर" तावीनं मान डोलावली. "मला सर्व गोष्टी करता येतात," आणि लांब पायमोजा तो वरती खेचू लागला.

"तुला सर्व काही करता येतं," न्यासू घोगऱ्या आवाजात म्हणाला, "आणि तुझ्या धाकट्या भावाला काहीसुद्धा करता येत नाही. त्याला पायमोजासुद्धा खेचता येत नाही. मग छोटा भाऊ जमिनीवरचा घाणेरडा खडा उचलतो आणि तोंडात घालतो. तुझी आई ते पाहते आणि म्हणते:

'असा कसा रे तू वेडा! तावी बघ कसा शहाणा! तो कध्धी कध्धी खडा तोंडात घालत नाही. तावी मोठा आणि शहाणा आहे.'"

"आणि आई असं म्हणाली नाही तर?" तावीनं शंका काढली.

"म्हणेल. नक्की म्हणेल."







"मग छान आहे," तावी मान डोलावीत म्हणाला. "पण मला छोटा भाऊच नाही रे!"

"अरेच्चा, खरंच की!" उसासा टाकीत न्यासू म्हणाला. "हे माझ्या लक्षातच नव्हतं!"

तेवढ्यात दाराशी आई आली.

"अजून तू कपडे करतोयस?" आई उद्‌गारली. "किती उशीर लावतोस रे! आज बालोद्यानात जायला नक्की उशीर होणार!"

# तुझ्यापाशी काय आहे?

तावीला आणि आईला बालोद्यानात जायला उशीर झाला. सगळी मुलं व्यायाम करायला गेली तरी तावी अजून अंगातला कोट काढीत होता.

तावीनं आईचा निरोप घेतला आणि तोसुद्धा व्यायाम करायला पळाला. तावी आपल्या मित्रापाशी – नीगुलपाशी – जाऊन उभा राहिला.

"पुस्तक आणलंस?" नीगुलनं विचारलं.

तावी अगदी विसरून गेला होता की, नीफ-नीफ, नाफ-नाफ आणि नूफ-नूफ नांवाचं एका डुकराची गोष्ट सांगणारं पुस्तक, नीगुलला आणून द्यायचं त्यानं कबूल केलं होतं.

"विसरलो," सुस्कारा टाकीत तावी म्हणाला.

"माझ्यापाशी पत्र्याचा शिपाई आहे," नीगुल म्हणाला. "तुझ्यापाशी काय आहे? आपण अदला-बदल करू या?"

तावीच्या खिशात रबरी कुत्रा न्यासू होता. पण न्यासू तर तावीचा मित्र! मित्राची अदलाबदल करायची नसते.

"माझ्यापाशी काहीच नाही रे," तावी म्हणाला.

"ठीक आहे. मी देतो तुला शिपाई. घरी माझ्यापाशी आणखी बारा शिपाई आहेत," बढाई मारीत नीगुल म्हणाला. "मात्र तू पुस्तक आण. आणशील?"

तावीनं पुस्तक आणायचं वचन दिलं. त्यांना आणखी बोलता आलं नाही, कारण त्यांना व्यायाम करायचा होता.



# खिशामध्ये

नुसतं खिशात बसून रहायचं म्हणजे फार फार कंटाळवाणं काम! न्यासूला बालोद्यानात असा खूप कंटाळा आला. खिशातून नाकसुद्धा बाहेर काढायची चोरी! बालोद्यानातल्या बाईंच्या लक्षात ते आलं असतं आणि घरून खेळणी आणायला बालोद्यानात परवानगी नव्हती. आणि न्यासू तसा दिसायला सरळ साधा रबरी कुत्रा होता. उगीच दुसऱ्यांना कशाला सांगायचं? तावीनं कुणाला सांगितलं नव्हतं आणि न्यासूसुद्धा चूप बसला होता.

खिशात अंधार होता आणि दाटी होत होती. न्यासूला झोपेची गुंगी येऊ लागली, कारण सबंध रात्र तो झोपला नव्हता.

एवढ्यात झोपेत त्याला जाणवलं की, त्याला काहीतरी टोचलं! न्यासूनं डोळे उघडून पाहिलं तर समोर निळा पत्र्याचा शिपाई!"

"बंदूक बाजूला घे," न्यासू त्याला म्हणाला. "तू माझ्या कानात ती खुपसलीस!"

बंदूक बाजूला घेत शिपायानं माफी मागितली: "तुला टोचायची माझी अजिबात इच्छा नव्हती. पण इथं अंधार आणि दाटी."

"मग इथं आलास कशाला तुला आवडत नाही तर?" न्यासूनं विचारलं.

"मी शिपाईगडी. आज्ञा पाळणं हे माझं काम."

"जर आज्ञा पाळणं हे तुझं काम, तर खिशाच्या दुसऱ्या कोपऱ्यात जा," न्यासूनं आज्ञा केली.

पण शिपाईसुद्धा वस्ताद होता.

"मी फक्त तावीची आज्ञा पाळीन. आता तो माझा सेनापती."

# हिवाळ्यातली लांबलचक झोप

या वेळात सेनापती तावी हा त्या शिपायचा पूर्वीचा सेनापती नीगुल याच्याशी गप्पा मारण्यात गुंतला होता. छे: छे:! ते कसल्याही लढाईच्या योजना आखत नव्हते. उलट शिपायाबद्दल ते दोघेही खिशात विसरून गेले होते.

उन्हाळ्यामध्ये आपल्या मावशीच्या खेड्यात येण्याचं निमंत्रण नीगुल तावीला देत होता.







"तावी, त्याला हो म्हणू नको," खिशातून न्यासू गुरगुरला. "तुला कावळ्यांची भीती वाटते आणि खेड्यात तर चिक्कार कावळे. त्याला सांग, तुम्हा दोघांना रस्ता सापडायचा नाही."

"आपल्याला तिथं जायचा रस्ता सापडणार नाही," तावी नीगुलला म्हणाला.

"अरे अगदी सोप्पं आहे," नीगुल त्याला समजावून सांगू लागला. "सुरवातीला बसमधून जायचं. बस थांबली की पुढं लागतं दाट जंगल. त्या जंगलापलिकडं मावशीचं घर. तिथपर्यंत जंगलातून गेलं पाहिजे आणि जंगलात दोन अस्वलं राहतात. ती अस्वलं खूप प्रेमळ आहेत. मावशीच्या अंगणात बदकं आहेत. काय कलकलाट करतात ते तू बघशीलच! माना लांब करतात आणि क्लॅक-क्लॅक..."

तावी कावळयांबद्दल विसरला आणि म्हणाला:

"उद्याच जाऊ या."

"उद्या नाही जमायचं" मान हलवीत नीगुल म्हणाला. "बदकं आता हिवाळयाची लांब झोप काढतायत."

हिवाळयातली लांब झोप बदकं नाही काढीत, तर झुलणारी अस्वलं कुंभकर्णासारखी झोपतात, हे न्यासूला खिशातून हळूच घोगऱ्या आवाजात सांगायचं होतं. पण न्यासूला तोंडच उघडता येत नव्हतं. निळ्या पट्ट्याच्या शिपायानं आपल्या हाताच्या कोपऱ्यानं न्यासूचं तोंड बंद करून ठेवलं होतं.

न्यासू गडाबडा लोळू लागला.

"कोपर बाजूला घे."

"माझी चूक नाही," माफी मागत शिपाई म्हणाला. "इथं मला खूपच दाटी होतेय आणि अंधार आहे."

"मग उजेड पाड," रागावून न्यासू म्हणाला. "तुझ्या संगीनीनं खिशाला भोक पाड."

"चालेल तसं केलं तर?" शिपायाने शंका काढली.

"चालेल. मी इथं खूप दिवस राहतोय. तेव्हा तसं केलेलं चालेल हे मला ठाऊक आहे."

निळ्या पट्ट्याच्या शिपायाने खिशाला भोक पाडले. त्यातून डोके बाहेर काढून पाहिले. बालोद्यान नव्हते! न्यासू आणि शिपाई बोलत होते तेवढ्या वेळात तावीने अंगात जाकीट घातले होते व आईबरोबर ते घरी निघाले होते.

भोकामधून डोकावून पहायची न्यासूचीसुद्धा इच्छा होती. पण अचानक त्याचा निळ्या पट्ट्याच्या शिपायाला धक्का लागला आणि शिपाई एकदम त्या भोकातून सरळ खाली बर्फावर कोसळला

"त्यानं बर्फावर कशाला उडी मारली?" न्यासू मनात विचार करू लागला. "कुणास ठाऊक! बहुतेक तोसुद्धा हिवाळयाची झोप काढणार असेल! खुशाल काय पाहिजे ते करू दे! आता एकट्याला खिशात कसं ऐसपैस वाटतं!"



## घरी

घरी आल्यावर तावीला शिपायाची आठवण झाली आणि तो खिशात हात घालून शोधू लागला पण खिशात फक्त न्यासू होता.

"त्याला शोधू नको. तो गेला," न्यासू म्हणाला.

"तू मला आधी का सांगितलं नाहीस?" रागावून तावी म्हणाला.

"कशाला? अगदी वाईट शिपाई होता तो! त्यानं मला आपल्या बंदुकीनं खुपसलं. त्यानं माझ्या चिंध्या करून टाकल्या असत्या. मग हलक्या आवाजात तुला चांगला सल्ला कुणी दिला असता?"

तावी गप्प राहिला. पण हरवलेल्या पत्र्याच्या शिपायाबद्दल त्याला वाईट वाटत राहिलं.

"एवढं वाईट वाटून घेऊ नकोस," न्यासू घोगऱ्या आवाजात तावीला म्हणाला. "कदाचित तो शिपाई नीगुलकडं परत गेला असेल."

## आई आणि बाबा बाहेर जातात

संध्याकाळी आईनं तावीला लौकर झोपायला सांगितलं. आई आणि बाबा कुणाकडं तरी जाण्याच्या तयारीत होते. पण तावीला काही झोप येईना. शेजारच्या खोलीतलं आई-बाबांचं बोलणं त्याला ऐकू येत होतं.

"तो घरी एकटा राहणार म्हणून मला खूप बेचैन वाटतंय," आई म्हणाली.

"असं काय घडणार आहे?" बाबांनी विचारलं.

"ठाऊक नाही. बालोद्यानात सध्या वाराफोड्यांची साथ आहे. हा आजार साथीचा आहे. आपण बाहेर असू, तेवढ्या वेळात तावीला ताप चढला नाही म्हणजे मिळवली!"

"छे: छे! तावी चांगला ठणठणीत आहे," बाबांनी आईची समजूत घातली. "आपण आत्ता लौकर जाऊ या, म्हणजे लौकर परतता येईल. तो झोपला का? पहा बघू!"

आईनं तावीच्या खोलीत डोकावून पाहिलं. तावीनं गपकन डोळे मिटून घेतले.


"झोपलाय," हलक्या आवाजात आई म्हणाली.

आई आणि बाबा बाहेर गेले तेव्हा तावीनं डोळे उघडले आणि न्यासूला हाक मारली:

"न्यासू, तू झोपलास?"







"नाही," न्यासू उत्तरला.

"तू ऐकलंस, वाराफोडचा हा साथीचा रोग आहे. कुणास ठाऊक, एकदम आपण दोघं आजारी पडलो तर?"

"मी नाही आजारी पडायचा," न्यासू फुशारकी मारीत म्हणाला: "बालोद्यानात मी तुझ्या खिशात बसलो होतो आणि तिथं मला वारा लागत नव्हता. मग फोडचा कशा येतील?"

"त्याचा काही संबंध नाही," उसासा टाकीत तावी म्हणाला. "माझ्या हातावर जंतू असण्याची शक्यता होती आणि मी तुला हातांनी गोंजारलं होतं."

यावर मात्र काय बोलावं ते न्यासूला माहीत नव्हतं. तावीला न्यासूची दया आली:

"तू घाबरलास?"

# न्यासू डॉक्टर बनतो

न्यासू फार काळ दुःख करीत बसला नाही. आपल्या रबरी नाकानं तावीला ढोशीत तो म्हणाला:

"ऐक तावी. तू फ्लू तापानं आजारी पडला होतास तेव्हा औषधं घेतलीस आणि बरा झालास, ते तुला आठवतं?"

"बरं मग?"

"मग आजारी पडण्याआधीच औषधं घेतली तर? तर तू आजारी पडणार नाहीस, होय की नाही?"

"मा ऽ ही ऽऽ त ना ऽऽ ही," लांब सूर काढीत तावी म्हणाला.

"पण मला माहीत आहे," ठाम आवाजात न्यासू म्हणाला. एकदम डॉक्टरचा आव आणून तो म्हणाला:

"औषधांची पेटी शोधून काढ पाहू."

औषधांची पेटी खूप उंचावर होती. तावीनं खुर्ची ओढून आणली आणि तिच्यावर तो उभा राहिला. पण औषधांच्या पेटीचं झाकण बंद होतं.

"औषधांच्या पेटीवर किल्ली आहे," न्यासूने सांगितलं.



तावी चवड्यांवर उभा राहिला, त्यानं किल्ली शोधली आणि कुलुपात घालून फिरवली. पेटीचं झाकण उघडलं.

औषधांच्या पेटीत भुकट्या होत्या, गोळ्या होत्या आणि औषधाच्या बाटल्या होत्या. कोणत्या भुकट्या आणि गोळ्या घ्यायच्या ते तावीला ठाऊक नव्हतं.

"सगळी औषधं थोडी थोडी चाख," न्यासू त्याला शिकवीत म्हणाला.

तावी स्वतः औषधांचा नमुना चाखू लागला व न्यासूलाही देऊ लागला. काही औषधं कडू होती, तर काही गोड होती.

एकदम तावीला जोरात झोप येऊ लागली. तो पलंगावर आडवा झाला आणि ताबडतोब गाढ झोपी गेला.

# जागे झाल्यानंतर

तावी जागा झाला तेव्हा खोली पाहून त्याला खूप आश्चर्य वाटले. खोलीच्या भिंती पांढऱ्या होत्या, भिंतीवर कोणतीही चित्रं टांगलेली नव्हती आणि खोलीचं छत खूप उंच होतं. पलंगाशेजारी आई बसली होती. पण पलंग तावीचा नव्हता आणि ती खोलीही दुसऱ्या कुणाची तरी होती.

"मी कुठाय? कुठं येऊन पडलो?" असं विचारायची तावीची इच्छा होती. पण त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडायला कष्ट झाले. त्याला आणखी झोप येत होती.

"अरे माझ्या वेड्या सोनुल्या!" आई म्हणाली. "एकदाचा जागा झालास तर! इतकी औषधं का खाल्लीस ते सांग बघू?"

"कशाला? कारण न्यासूनं सांगितलं म्हणून!" तावीला आठवण झाली. "त्याला वाराफोड्यांनी आजारी पडायचं नव्हतं."


"डॉक्टरांनी सांगितलं तरच औषध घ्यायचं असतं," आई म्हणाली.

न्यासू डॉक्टर कसा बनला होता ते तावीनं आईला सांगितलं नाही. तो गप्प बसला.

"बरं आता शांत पडून रहा बघू," आई म्हणाली. "लौकर बरा हो, मग मी तुला इस्पितळातून घरी घेऊन जाईन. तुला तुझा न्यासू आणून देऊ का?"







"नको," तावीनं मान हलवून नाही म्हणून सांगितलं.
न्यासूचं तोंड पहायची त्याची इच्छा नव्हती.
"न्यासू माझा मुळीच मित्र नाही," तावीच्या मनात विचार आला.

# भांडण मिटले

इस्पितळात काही दिवस राहिल्यानंतर तावी घरी परतला. तो आपल्या खोलीत गेला, तिथल्या वस्तू त्यानं उलटचा-पालटचा करून पाहिल्या. पुन्हा एकदा त्या वस्तूंची त्याला सवय झाली. स्वतःच्या पलंगावरच्या पांघरुणावरून त्यानं हळूच हात फिरवला. इस्पितळातलं पांघरुण जास्त खरबरीत होतं. पेटीवरच्या फुलांचा त्यानं वास घेतला. इस्पितळात पेटीवर फक्त पाण्याचा खुजा होता. तावीनं जवळ जवळ सबंध खोलीभर चक्कर मारली, पण कोपऱ्यात जिथं खेळणी पडली होती तिकडं मात्र त्यानं ढुंकून पाहिलं नाही.

तिथंच न्यासू होता.

तावीचा न्यासूवर अजून राग होता.

एवढ्यात तावीला बारिकसा आवाज ऐकू आला. जणू टपकन थेंब पडावा तसा. खिडकीबाहेरच्या बर्फाच्या काड्या वितळत असतील, त्यांच्या पाण्याचा आवाज तर नाही? किंवा न्यासू तर कोपऱ्यात बसून रडत नसेल? आपण वाईट वागलो हे कदाचित न्यासूला उमजलं असेल आणि आता त्याला चांगलं वागावंसं वाटत असेल?

तावीला न्यासूची दया आली.

कदाचित न्यासूसुद्धा आजारी पडला असला तर? तसं पाहिलं तर त्यानंसुद्धा माझ्याएवढीच औषधं खाल्ली होती! पण न्यासूला इस्पितळात कुणीच आणलं नाही. त्याच्यासाठी डॉक्टरनासुद्धा कुणी बोलावलं नसणार! इतर खेळण्यांबरोबर त्यालाही खोक्यात टाकून दिलं आणि लोक त्याला विसरले.

तावी न्यासूपाशी गेला. न्यासू खोक्यात पडला होता व तावीकडे कष्टी नजरेनं बघत होता.

"न्यासू, तू आजारी पडलायस का?" आपल्या रबरी कुत्र्याला तावीनं हळूच विचारलं. त्याच्या डोक्यावरून, कानांवरून, डोळयांवरून मायेनं हात फिरवला. न्यासूच्या डोळयांवर आणि कानांवर धूळ



वाळली होती. तावीनं न्यासूला स्वच्छ पुसून काढलं. धूळ झटकून टाकल्यानंतर न्यासूचे बटणाचे डोळे पुन्हा आनंदानं चमकू लागले.

"मी प्रकृतीनं चांगला ठणठणीत आहे," न्यासू म्हणाला. "फक्त तुझ्याशिवाय मला करमत नव्हतं."

"माझा न्यासू! माझा न्यासू! माझा न्यासू!" तावी न्यासूचे लाड करीत, त्याला जवळ धरून कुरवाळीत म्हणाला.

"मला तुझ्या खिशात जाऊन बसायचंय," घोगऱ्या आवाजात न्यासू म्हणाला.

"हे," असं म्हणून तावीनं आपल्या मित्राला आपल्या खिशात जायला मदत केली.

# न्यासू पोहायला जातो

आजारपणानंतर तावीला पहिल्यांदाच बाहेर फिरायला जायची परवानगी मिळाली होती. अर्थातच बाहेर फिरायला जाताना त्यानं आपला न्यासू कुत्रा बरोबर घेतला होता, कारण आता ते दोघं पुन्हा मित्र झाले होते. सूर्य तेजानं चमकत होता. छपरावरून ओघळणाऱ्या बर्फाच्या पाण्याच्या ओहळांचा मंजुळ आवाज ऐकू येत होता.

"ओहळात पोहायचंय तुला?" तावीनं आपल्या मित्राला विचारलं.

"न ऽऽ ला ऽऽ मा ऽऽ ही ऽ त ऽ ना ऽऽ ही," न्यासू लांब सूर काढीत म्हणाला. "पोहायला जमेल मला?"

"जमेल जमेल," तावी उत्साहानं म्हणाला आणि न्यासूला पाण्याच्या ओहळात सोडलं.

पण अंगणात पोहायला काही गंमत येत नव्हती. ओहळ अगदीच अरुंद होते आणि न्यासूचं नाक सारखं काठाच्या किनाऱ्याला आपटत होतं.

"मला बाहेर रस्त्यावर घेऊन चल," न्यासू तावीला म्हणाला. "तिथं ओहळ जास्त रुंद आहेत."

ते दोघंही रस्त्यावर गेले. तिथं त्यांना मोठा ओहळ दिसला. त्या ओहळात न्यासूला मोकळेपणी पोहता येत होतं. पाणी जोरात वाहात होतं. पाण्याच्या प्रवाहाबरोबर न्यासू वेगानं मजेत पोहत होता.







इतक्यात कसलातरी गोंगाटाचा आवाज ऐकू आला. रस्त्याच्या कोपऱ्यावर ड्रेनजेच्या जाळीमधून पाणी खाली कोसळत होतं. न्यासू घाबरला. पाण्याचा लोंढा त्याला त्या जाळीत ढकलणार तर नाही? न्यासू किनाऱ्याला पोहत जायचा प्रयत्न करू लागला, पण त्याला ते जमेना.

"तावी, मला मदत कर!" घोगऱ्या आवाजात न्यासू ओरडला.

पण तावीचं लक्ष दुसरीकडं कुठंतरी होतं. त्याला न्यासूचं घोगरं ओरडणं ऐकू गेलं नाही.

आता जगण्याची कोणतीही आशा उरली नाही असा विचार न्यासूच्या मनात आला न आला तोच कुणीतरी त्याचा पाय धरून त्याला खेचलं. न्यासूनं पाहिलं तर तो निळा पत्र्याचा शिपाई होता.

"माझा जीव वाचवल्याबद्दल मी तुझा आभारी आहे," न्यासू म्हणाला. "पण तू कुठं इकडं?"

"मी इथं केव्हाचा आहे," शिपाई म्हणाला. "वसंताच्या मोसमासाठी वाट करून देतोय. बर्फ खोदून रस्ता बनवतोय. आता मी शांतीसैनिक आहे."

तेवढ्यात तावीचं शिपायाकडं लक्ष गेलं आणि तो आनंदानं ओरडला:

"अरेच्चा! शिपाईदादा? तू सापडलास तर!"

पत्र्याच्या शिपायानं टाचा जुळवून खाडदिशी स्वतःच्या सेनापतीला सलामी ठोकली.


पण तावीकडं लक्ष देता देता शिपायानं चुकून क्षणभर रबरी कुत्र्याचा पाय सोडला होता. ताबडतोब पाण्याच्या प्रवाहानं न्यासूला जोरात पुढं लोटलं व न्यासू जाळीच्या दिशेनं वाहू लागला. अगदी शेवटच्या क्षणाला तावी आपल्या मित्राला वाचवू शकला. नंतर त्यानं पत्र्याच्या शिपायालाही ओहळातून वर उचलून घेतलं.

# न्यासूचे गुपित

संध्याकाळ झाली. खिडकीबाहेर अंधार पडला. आणि आता तावी झोपायच्या तयारीत असताना न्यासू कुठंतरी हरवावा याला काय म्हणावं बरं?

तावीनं शिपायाला बरोबर घेऊन न्यासूला शोध शोध शोधलं. पण न्यासू काही सापडला नाही. तेव्हा आपल्या मित्राशिवायच तावी एकटा झोपला.

तावीला बारीकशी डुलकी लागली आणि पुन्हा जाग आली. सगळीकडं शांत होतं. खिडकीमधून चंद्र प्रकाशताना दिसत होता. चांदण्याच्या प्रकाशात तावीला टेबलावर नवी खेळणी ठेवलेली



दिसली: चावीची मोटार, ट्रॅक्टर! "कुठून आली ही खेळणी?" चकित होऊन तावी पहात पाहिला.

तो पलंगावरून उठून टेबलापाशी गेला. तिथं त्यानं कुणाला पाहिलं असेल असं तुला वाटतं? अर्थातच न्यासूला! न्यासू टॉफीच्या भल्या मोठ्या खोक्यावर बसला होता आणि तावीकडं लबाड नजरेनं पहात होता.

"कुठं होतास तू?" तावीनं विचारलं.

"ते आमचं गुपित आहे," घोगऱ्या आवाजात न्यासू म्हणाला.

"कसलं गुपित?"

"उद्या सकाळपर्यंत मी त्याबद्दल गप्प बसलं पाहिजे."

"हळूच कानात सांग," तावीनं विनवणी केली.

"बरं बाबा, सांगतो! उद्या तुझा वाढदिवस. म्हणून तुला भेटवस्तू आणायला मी गेलो होतो. पण आत्ता मात्र एकसुद्धा टॉफी खायची नाही. नाहीतर मी तुला आधी सांगितलं हे सगळ्यांना समजेल."

"नाही खात टॉफी," तावीनं वचन दिलं.

"मला आणखी एक गंमत ठाऊक आहे," न्यासू घोगऱ्या आवाजात म्हणाला.

"कसली गंमत?"

"उद्या तू मला पुन्हा खिशात घाल आणि आपण बालोद्यानात जाऊ. आता तू खडखडीत बार [illegible]. तिथं बालोद्यानात खूप खूप मजा येते. शिवाय लौकरच मे दिनाचा सण येतोय."

"हुर्रा ऽऽ!" दबत्या आवाजात तावी ओरडला.

"हुर्रा ऽऽ!" न्यासूनं त्याला साथ दिली.

